Vol-3 Issue-1
JAN-2014

ISSN-2250-0383

SHODHANKAN

# SHODHANKAN

Quarterly
International
Multi - Disciplinary
Referred & Reviewed
Research Journal

Chief Editor- Dr. Joshi R.L.

# Index



| S.No. | Paper Name | Name | Page No. |
|---|---|---|---|
| १ | तळाकडून इतिहास | डॉ. फडतरे भूषण गोविंद | १ ते ५ |
| २ | लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिर चिपळूण (स्थापना – १८६४) | प्रा. भागवत प्रसाद सुरेश | ६ ते १२ |
| ३ | फलटण संस्थानातील स्त्री शिक्षणाचा विकास | प्रा.डॉ.गावडे एस.एम्. | १३ ते १५ |
| ४ | कातकरी आदिवासींची संस्कृती | प्रा.भारत शां.खराडे | १६ ते २१ |
| ५ | अकबराचे धार्मिक धोरण- एक अभ्यास | प्रा.डॉ.जोशी आर.एल. | २२ ते २५ |
| ६ | गोवा मुक्ती आंदोलनातील समाजवादी विचारवंत नानासाहेब गोरे यांचे योगदान | प्रा.डॉ. मोकाटे नाथा रामभाऊ | २६ ते ३० |
| ७ | गोवा मुक्ती आंदोलनावर आधारित पोवाडे व गीते | प्रा.डॉ.शांताराम शेलार | ३१ ते ३५ |
| ८ | “स्त्री भ्रूणहत्या-कायदा उपाययोजना” | प्रा. सौ. अरुणा रविंद्र वाघोले | ३६ ते ४१ |
| ९ | बदलती राजकीय, आर्थिक स्थिती आणि ग्रामीण साहित्य | प्रा. डॉ. अनिल गर्जे | ४२ ते ४६ |
| १० | ख्रिस्ती मराठी कविता : वाड्.मयीन मूल्यमापन | सौ. भारती मच्छिंद्र काळे | ४७ ते ५२ |
| ११ | १९९० नंतरच्या मराठी साहित्यातील देवदासी स्त्रीचे चित्रण (बदलते संदर्भ) | डॉ.सौ. वंदना विनायक नढे | ५३ ते ५५ |
| १२ | “स्त्रीवाद: आणि स्त्रीवादी साहित्य” | डॉ. चंद्रकांत रुद्राक्ष | ५६ ते ६२ |
| १३ | मानवीय संवेदना के कवि रहीम | डॉ.सौ. मेहेरे एस. आर. | ६३ ते ६७ |
| १४ | भारताला दहशतवादाचा शाप ! | प्रा.यासीन जी.सय्यद | ६८ ते ७२ |
| १५ | “सुशासन” (Good Governance) | | ७३ ते ७९ |
| १६ | Indian Ethos and The Treatment of Themes in Swami and Friends: | Bavikar Rashmi Ramakant | ८० ते ८६ |
| १७ | A Study of Code-Mixing in The Partition Novel ‘Train to Pakistan’ | Professor Vallabh Shankar Karandikar | ८७ ते ९० |

**MARATHI**
ISSN – 2250-0383
RNI-02988/13/01/2011-TC

# १९९० नंतरच्या मराठी साहित्यातील देवदासी स्त्रीचे चित्रण (बदलते संदर्भ)

डॉ. सौ. वंदना विनायक नढे
मराठी विभाग श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर बोडकेनगर, जुन्नर मो. नं.- ९९७५८६१९९७

१९९० ते २०००ह्या कालखंडात मराठीतील साहित्यातून चित्रित झालेली देवदासी स्त्री अभ्यासण्याआधी १९७० ते १९९० पर्यंतचा कालखंड अभ्यासणे अनिवार्य आहे. म्हणून १९७० ते १९८० आणि १९८० ते १९९० असे दोन कालखंड केले. कारण देवदासी विषयक कायदा १९३४ ला संमत झाला होता त्या कायद्यात सुधारणा होऊन १९७५ मध्ये अंमलात आला. त्याचा परिणाम सर्व देशभर झाला. साहजिकच मराठी साहित्य त्याला अपवाद ठरले नाही.

भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर समाजात सामाजिक, राजकीय, वैचारिक तसेच आर्थिक स्थित्यंतरे घडली. मानवी हक्काची जाणीव प्रत्येक व्यक्तीला, जाती-धर्माला झाली. त्याचा पडसाद कळत नकळत समाज मनावर व व्यक्तिमनावर उमटला. त्यातून नवा प्रवाह निर्माण झाला. त्यातच अशा स्त्रियांसाठी शासनाने ठोस पावले उचलली.

साहजिकच या चळवळींमुळे देवदासी स्त्रियांच्या समस्येकडे समाजाचे लक्ष वेधले गेले. देवदासी स्त्री स्वतः शिकली तरच धर्मकांडाविषयी जाणीव जागृती होईल व ती स्वतः त्यातून मुक्त होईल, असा विश्वास शासनाला वाटला. म्हणून शासनाने अनेक उपाययोजना आखल्या आणि त्या अंमलात आणल्या त्याचा परिणाम म्हणजे कलाकृतीला नाविन्यपूर्ण विषय मिळाला व लेखकांनी तो चित्रित केला.

**१९७० ते १९८० पर्यंतचा पहिला टप्पा -**

१) वर आभाळ खाली धरती - महादेव मोरे    २) जोगीण - सुभाष भेंडे

ह्या काळातील कलाकृतीतील नायिका बंधनात जखडलेली, परमेश्वराविषयक श्रद्धा जपणारी, स्वतःला परमेश्वराची सेवा करायला मिळाली म्हणून भाग्यवान समजणारी स्त्री बंधन स्वीकारताना दिसते. म्हणून हा काळ **'आजीचा'** म्हणजे पुराणमतवादी विचार असणाऱ्या स्त्रीचा कालखंड आहे, असे जाणवते.

**१९८० ते १९९० पर्यंतचा दुसरा टप्पा -**

१) नापत - बळवंत कांबळे    २) चौडकं- राजन गवस
३) झुलवा - उत्तम बंडू तुपे    ४) भंडार भोग - राजन गवस

ह्या कालखंडातील स्त्री पिढीजाततेने, जबरदस्तीने, आगतिकतेने, जगण्यासाठी व उदरनिर्वाहासाठी दुसरा पर्याय नाही म्हणून देवदासी बनलेली दिसते. त्या देवदासी स्त्रीला परिवर्तनाची इच्छा असूनही ती त्याला विरोध करु शकत नाही म्हणूनच हा जणू **'आईचा'** काळ आहे,असे जाणवते.

वास्तविक पाहता, देवदासी संरक्षण कायदा १९३४ मध्येच संमत केला होता. परंतु प्रत्यक्षात हा कायदा कागदावरच राहिला.

खऱ्या अर्थाने १९७५ पासून देवदासींच्या पुनर्वसनेची चळवळ पुन्हा वेगाने कार्य करु लागली. देवदासी भगिनी परिषद, राज्य देवदासी मुक्ती संघटना, चौडकं मोर्चा या परिषद व मोर्चाबरोबर त्यांच्या पुनर्वसनाच्या योजना राबविल्या गेल्या. तसेच एक अभ्यास गट नेमून देवदासी विषयक अहवाल तयार केला गेला. या सर्वांमुळे प्रथेविषयी देशभर जाणीव जागृती घडू लागली.

या परिणामातून १९९० नंतरच्या साहित्यकृतीतून देवदासी स्त्री प्रथेविरुद्ध (बंड) लढा देण्यास सज्ज झालेली दिसते. १९७५मध्ये देवदासी प्रथेविरुद्धचा कायदा पुन्हा अंमलात आला. जो वर्ग समाजापासून, सुधारणांपासून वंचित होता, जो धार्मिक रुढी-परंपरांच्या शृंखलांनी जखडलेला होता. त्या स्त्रियांमध्ये वैचारिक परिवर्तन घडले. त्यामुळे त्या स्त्रिया प्रथांना प्रखरपणे विरोध करु लागल्या. या सर्व घडामोडींना ३० वर्षाचा काळ लागला.

**१९९० ते २००० काळातील साहित्य -**

१) सौंदतीच्या वाटेवर - सुरेश माने २) जोगव्याचे दिवस - बळवंत कांबळे
३) भंडारा - रामनाथ चव्हाण ४) जोकतीण - शंकरराव खरात
५) मुरळी (गाव-शिव) - शंकरराव खरात ६) मुरळी - व.बा.बोधे

या साहित्यातील सुशिक्षित देवदासी स्त्रिया जोडीदाराच्या सहाय्याने देवदासी प्रथेविरुद्ध बंड करु लागल्या. ही प्रथा धर्माच्या नावाखाली चाललेली फसवेगिरी आहे, हे देवदासी होणाऱ्या स्त्रियांना जाणवले म्हणून त्या नैराश्याच्या, उदासिनतेच्या वलयाबाहेर येऊन संघटित झाल्या व प्रथेविरुद्ध क्रांतीची ज्योत पेटविण्यास सज्ज झाल्या.

उदा. - **सौंदतीच्या वाटेवर** - काव्य - "जोगवा जोगवा न्हाय मागायचा जोगवा
आयानू, माझ्या भगिनिंनो ज्योत क्रांतीची पेटवा"

यातूनच समाजातील धार्मिक प्रथा -परंपराविषयी जनजागृती करण्याच्या दृष्टीने लेखकांना नवा विषय मिळाला या नव्या रचनेचा अंगीकार सामान्य माणूस चिकाटीने, धैर्याने व चाकोरीबद्ध जीवन प्रणाली सोडून करु लागला. लेखकाच्या या कार्यामुळे परिवर्तनाचा स्वीकार समाजातील व्यक्ती हळूहळू करु लागली. या नव्या रचनेमुळे देवदासी होणाऱ्या स्त्रियांच्या मानसिकतेत बदल घडू लागला.

(१९९० ते २०००) या काळात शिक्षणाचा प्रसार आणि प्रचाराने मानवाची वैचारिक क्षमता वाढली त्यामुळे समाजातील प्रथा,परंपरामागील धर्ममार्तंडाचा स्वार्थहेतू समाजातील घटकांना जाणवू लागला. त्यामुळे त्यांना प्रतिष्ठा मिळावी या शासनाच्या धोरणाला त्यांनी पाठिंबा दिला. त्यांनी प्रथेमागची धार्मिकता स्वतः तपासली. त्या देवदासी स्त्रिया शिकल्या, सुशिक्षित झाल्या. नोकरी व्यवसाय करु लागल्या.
उदा.- शंकरराव खरात यांच्या "जोकतीण" कथेतील शीला शिकल्याने त्या प्रथेस विरोध करते व यांच्या पतीबरोबर सुखी संसारात रमते तर **"जोगव्याचे दिवस"** ह्या कादंबरीतील बळवंताचे वडील अंधश्रद्धेविरुद्ध लढा देतात. तर सुरेश माने हे **"सौंदत्तीच्या वाटेवर"** ह्या काव्यसंग्रहात प्रथेविरुद्ध क्रांती घडवतात.

गाव-शिव कथासंग्रहातील**"मुरळी"**या कथेतील गीता,**"भंडारा"**कादंबरीतील रत्ना, व.बा.बोधे यांच्या **"मुरळी"** कादंबरीतील राधा ह्या सर्व स्त्रियांना ही प्रथा थोतांड आहे, याची जाणीव झालेली दिसते. त्यावेळी त्यांना भक्कम आधार मिळत असतो आपल्या पतीचा म्हणून राधाला सुभानराव, शीलाला सुशिक्षित जोडीदार, बळवंत कांबळे यांचे वडील हे सर्व पुरुष त्यांना सहकार्य करतात.

हा नवा विचार वाचक वर्गाला पटावा, तो आपल्याच गावचा आहे, असे वाटावे म्हणूनच लेखक संवादासाठी ग्रामीण बोलीचा तर निवेदनासाठी प्रमाण भाषेचा वापर करतात. त्यामुळेच उपेक्षित, दुर्लक्षित

समाजाचे, जमातीचे त्यांच्या व्यथेचे, भोगवादाचे, शोषणाचे, प्रदेशातील समूहाच्या मानसिकतेचे, अंधश्रद्धेचे, नैतिकतेचे दर्शन घडते.

उदा.- १) "शाळा शिकणं आपल काम न्हाय पोरा, तू खंडबाचा वाघ्या हाईस. त्याच्या नावानं भंडारा खोबरं उधळून वारी मागून पॉट भर. या शाळंतल्या पोरांच्यात मिसळू नगंस"

(भंडारा - रामनाथ चव्हाण)

२) "ती कवाच पळाली किस्न देवाला धिवून, मुड्द्या, तूच हपापलास पैशाला!"

(मुरळी - व.बा.बोधे)

**निष्कर्ष -**

१) पिढीजाततेस विरोध

२) पुरुषांच्या भोगवादी वासनेला विरोध

३) स्त्रीला स्त्रियांचा आधार

४) परंपरेमागे स्वार्थ भावनेची जाणीव

५) नवीन पिढीस त्या प्रथेपासून दूर ठेवण्याचा विचार

६) पुरुषांचा आधार

७) शिक्षणाचे महत्त्व

८) वृद्धपकाळासाठी नियोजन

९) स्वत:त वैचारिक परिवर्तन करण्यास तयार

१०) गर्भधारणा एक समस्या

११) तरुण पिढी व्यसनाधीन

१२) उदरनिर्वाहाची सोय नाही.

अशा रितीने काळानुरुप बदलेल्या सामाजिक घडामोडींचा व समाजव्यवस्थेचा कलाकृतीशी संबंध असतो म्हणूनच प्रत्येक कलाकृतीतील विषयात सामाजिक समस्याचे चित्रण येते.

**संदर्भग्रंथ**


१) महाराष्ट्र वाङ्:मयीन प्रवाह - कादंबरी - ल.ग.जोग

२) देवदासी : यल्लम्माच्या जोगतिणी - मदन कुलकर्णी

३) देवदासी नग्नपूजा - उत्तम कांबळे

४) भारतातील देवदासी प्रथा, चळवळ व पुनर्वसन - बळवंत कांबळे

५) मराठी कादंबरी तंत्र आणि विकास - ना.वा.गोडबोले व प्र.बा.बापट